# Bachelor of Arts (B.A.) Part-II Examination

## MARATHI (Optional)

## मराठी (ऐच्छिक)

## (Literature)

## (New Course)

वेळ—तीन तास] [एकूण गुण—100

1. आधुनिक मराठी काव्यप्रवाहांचा संक्षिप्त परिचय करून द्या. 10

किंवा

'उष:काल होता होता' या कवितेचे रसग्रहण करा.

2. कथा या वाङ्मय प्रकारांची संकल्पना आणि स्वरूप विशद करा. 10

किंवा

'नवस' या कथेतून शंकरराव खरातांनी समाजातील अंधाश्रद्धेचे दर्शन कसे घडविले ते सविस्तर वर्णन करा.

3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा : 20

गट 'अ'

(क) एक पुतळा उभारला की तुम्ही
एक पिंजरा तयार करता
आणि तुम्ही उभारलेल्या पुतळ्यां चं गाणं
जे गात नाहीत त्यांना त्यात टाकता

(ख) बापलेक गाजतात मायलेक गाजोतात
आमच्याच कातळयाचे सारे ढोल वाजोतात
रई लावतो लावतो घाम गयते गल्लीत
हाती ताकाचचं पानी लोनी लुटते दिल्लीत
आमच्याचं आसवाले येते आमचीच कीव।।

(ग) "बाई भागा, त्या कशा ऱ्हातील ग ? त्या सगळ्या चांगल्या घरच्या ! त्यांस्नी गरिबाची दयामाया कशी ईल !"

(घ) "बाहेर भटकून मला मार्ग सापडला आहे. मी काय करतोय ते कळतेय मला ! त्यामुळे ही दुर्दशा नष्ट होणार आहे. पुन्हा पूर्वीचे वैभवाचे दिवस आपल्याला लाभणार आहेत !"

किंवा

गट 'ब'

(च) हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाण च राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.

(छ) भावनांना चेव नाही
यौवना आव्हान नाही
संघर्ष नाही झुंज नाही
जावें ज्यामागे बेधडक
असा झुंजार वीर नाही



(ज) "पोरा, मुका ऱ्हायलाच पर तसंच गठुडं गावाकडं न्यावं लागेल. बैलाला खाऊ घालावं लागेल....अरं बोलंल त्याचं हुलगं इकत्यात, मुक्याचं गहूबी कुणी इच्यारीत नस्तंय."

(झ) 'बाबा रे, हा वसा कठीण. पेलेल तर घे. नाहीतर सारं इथंच मास्याबरोबर संपणार, थांबणार असं समजतो.'

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे लिहा : 20

**गट 'क'**

(त) 'मी होईन सहज' या कवितेतून स्त्रीमनाच्या भावभावनांचे दर्शन कसे घडते ?

(थ) कमल देसाई यांनी 'माणसाची गोष्ट' या कथेतून माणसाच्या उपरेपणाची जाणीव कशी करून दिली ?

(द) साहित्यप्रकारांची विशुद्धता स्पष्ट करा.

(ध) महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

**गट 'ड'**

(प) अजीम नवाज राही यांनी दुष्काळाची दाहक वास्तवता कशी पटवून दिली आहे ?

(फ) अनंताचे स्वभावचित्र रेखाटा.

(ब) 'प्रतिभे'च्या संदर्भातील प्रभाकर पाध्ये यांच्या विचार स्पष्ट करा.

(भ) स्त्री मुक्ती संघटनेच्या कार्याची ओळख करून द्या.

5. पुढील **सर्व** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : 20

(1) 'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही' असे कवी का म्हणतात ?

(2) "जो पर्यंत बाहेर भाविक लोकांची गर्दी आहे तोपर्यंत माझा फायदाच फायदा आहे !" असे ब्रजेश का म्हणतो ?

(3) टी.एस. एलियटच्या काव्यविचार स्पष्ट करा.

(4) सानिया यांच्या स्त्रीवादी लेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

6. खालील **सर्व** प्रश्नांची योग्य पर्यायी उत्तरे लिहा : 20

(1) आत्माराम रावजी देशपांडे यांचे टोपण नाव _______ आहे.

(अ) सुधाकर

(ब) अनिल

(क) पवन

(ड) सुनिल

(2) उभा देश झाला आता, एक बंदिशाला, जिथे देवकीचा पान्हा _______ जळाला !

(अ) अग्नीने

(ब) पाण्याने

(क) दुधाने

(ड) विषाने

(3) 'ऊलगुलान' हा कविता संग्रह _______ यांनी लिहिला.

(अ) केशव मेश्राम

(ब) भूजंग मेश्राम

(क) सत्यवान मेश्राम

(ड) जीवन मेश्राम



(4) 'भुईमाय' या कवितेचे कवी _______ आहेत.

(अ) प्रफुल्ल शिलेदार

(ब) अनुराधा पाटील

(क) बा.भ. बोरकर

(ड) बबन सराडकर

(5) २०१२ सलि चंद्रपूर येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद _______ यांनी भूषविले.

(अ) विठ्ठल वाघ

(ब) वसंत आबाजी डहाके

(क) अरुण साधू

(ड) शांता शेळके

(6) 'जाब' ही कथा _______ यांनी लिहिली.

(अ) उर्मिला पवार

(ब) दया पवार

(क) राम पवार

(ड) अशोक पवार

(7) रघुनाथ हे पात्र आशा बगे यांच्या _______ या कथेतील आहे.

(अ) खडक

(ब) मारवा

(क) शिल्प

(ड) पूजा

(8) 'आपण माणसात जमा नाही' ही कथा _______ यांची आहे.

(अ) कमल देसाई

(ब) राजन गवस

(क) सदानंद देशमुख

(ड) बाबूराव बागूल

(9) मराठी विज्ञानकथेचे शिल्पकार ______ यांना संबोधले जाते.

(अ) जयंत नारळीकर

(ब) निरंजन घाटे

(क) वि.द. घाटे

(ड) संजय नारळीकर

(10) 'अंगारमाती' हा कथासंग्रह ______ यांनी लिहिला आहे.

(अ) शंकर पाटील

(ब) आनंद यादव

(क) भास्कर चंदनशिव

(ड) शंकरराव खरात

(11) टी.एस. एलियटच्या मते कवीचा पहिला आवाज ______ असतो.

(अ) नाट्यकाव्यात

(ब) गीतीकाव्यात

(क) भक्तिकाव्यात

(ड) भावकाव्यात

(12) लँगरच्या मते कथनात्म प्रकारामध्ये प्रतिभासिक ______ प्रत्यय येतो.

(अ) वर्तमानकाळाचा

(ब) भूतकाळाचा

(क) भविष्यकाळाचा

(ड) यापैकी नाही



(13) मालशे यांच्या मते साहित्यप्रकारांच्या अंगभूत श्रेष्ठ-कनिष्ठतेचा विचार ______ आहे.

(अ) निरर्थक

(ब) निष्फळ

(क) वायफळ

(ड) सीताफळ

(14) काव्यनिर्मितीसाठी ______ ही आवश्यक आहे.

(अ) प्रज्ञा

(ब) सर्जनशिलता

(क) प्रतिभा

(ड) हुशारी

(15) कोलरिजच्या दृष्टीने ______ ही अनेकतेत एकता निर्माण करणारी, संश्लेषण करणारी शक्ती आहे.

(अ) कल्पनाशक्ती

(ब) विचारशक्ती

(क) आचारशक्ती

(ड) निर्णयशक्ती

(16) स्त्रीवादी चळवळ ही ______ चळवळ आहे.

(अ) जीवनमुक्तीची

(ब) स्त्रीमुक्तीची

(क) मानवमुक्तीची

(ड) राष्ट्रमुक्तीची

(17) 'वाळूचा प्रियकर' हा कवितासंग्रह ______ यांचा आहे.

(अ) अरूणा पवार

(ब) प्रज्ञा लोखंडे

(क) ज्योती लांजेवार

(ड) मलिका अमरशेख

(18) जहाल स्त्रीवादी शाखेचा उदय डाव्या विचारसरणीच्या ______ राजकारणातून झालेला दिसतो.

(अ) क्रांतिकारी

(ब) समाजवादी

(क) विद्रोही

(ड) देशद्रोही

(19) 'आवर्तन' या कादंबरीची लेखिका ______ आहे.

(अ) आशा बगे

(ब) निरजा

(क) सानिया

(ड) विभावरी शिरूरकर

(20) महिला दक्षता समितीची स्थापना ______ मध्ये दिल्ली येथे झाली.

(अ) १९७५

(ब) १९७६

(क) १९७७

(ड) १९७८